Edit with WPS Office

अनुभव कथन... हॉस्पिटलमध्ये भेटलेल्या आजीबाई

कधी कधी नशीब नावाचा परीक्षक इतकी विचित्र प्रश्नपत्रिका आपल्यापुढे ठेवतो की पुढ्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरेच अस्तित्वात नसतात... प्रयत्न आणि प्रार्थना एव्हढंच उत्तर आपल्या गाठीशी असतं... अश्या वेळी थकायचं नाही बास! २१ मार्च २०२० देशव्यापी लॉक डाऊन जाहीर झाला... आणि पहिला विचार मनात आला..." काहीही झाले तरी बाबांना आता हॉस्पिटलमध्ये न्यायची वेळ यायला नको"... गेली 3 वर्षे माझे बाबा केवळ आईच्या पुण्याईने जिवंत होते... त्यांच्या मेंदूच्या उजव्या बाजूला जेमतेम ४०% रक्तपुरवठा होत होता... त्यातून पॅरलाईज होऊन त्यांचं जग बेड पुरतं उरलं होतं. देवापुढची फुलवात जशी हळूहळू मालवत जाते तसे त्यांचे एकेक अवयव शांत होत होते.... दर दोन तीन महिन्यांनी त्यांची तब्येत कमालीची ढासळे, त्या त्या वेळी त्यांना हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यावाचून गत्यंतर नसायचे. मी ह्या हॉस्पिटल वाऱ्यांना आषाढी कार्तिकी म्हणायचे... नुकतीच फेब्रुवारीत त्यांची वारी झाली होती... आता मात्र त्यांना स्टेबल ठेव म्हणून मी देवापुढं पदर पसरला.

माझ्या आईवडिलांचं मी एकुलत एक अपत्य... त्यांच्या जोडीला घरात ८०वर्षांच्या सासूबाई आणि 8 वर्षांची लेक.पती संरक्षण संबंधी कारखान्यात कामाला असल्यानं कोरोना म्हणून त्यांना पंधरा दिवस जेमतेम सुट्टी मिळाली... आणि त्यांना जॉईन व्हायलाच लागलं... त्यामुळे सगळी मदार माझ्या खांद्यावर होती. त्यांच्या कंपनीत रोज वाढत्या आकड्यात कोरोना पेशन्ट निघायला लागले आणि त्यांनी स्वतःला आमच्यापासून वेगळं केलं... अस्पृश्यासारखे एका खोलीत , आमचा संपर्क टाळून ते बसायचे...अगदी लेकीलाही ते जवळ घेत नव्हते... ह्या साऱ्यापाठी घरात असलेल्या वयस्कर व्यक्तींची काळजी होती. मी वगळता घरातले सगळेच हाय रिस्क गटांत मोडणारे होते. सगळंच बंद झालेलं... त्यात घरकामाची बाई यायला तयार पण सोसायटीने परवानगी नाकारली... दूध देखील कधी मिळायचे तर कधी नाही... स्वयंपाक, भांडी घासणे , लादी-पोछा ह्या अखंड चालणाऱ्या कामांमध्ये अजून काही गोष्टी वाढल्या... अखंड घरात कोंडली गेल्याने कंटाळलेली लेक आणि बाबांचे नर्सिंग... तो पावेतो बाबांचे नर्सिंग, हलके व्यायाम आणि मसाजसाठी दोन तास एक दादा (ब्रदर) येत असत... आता तेही घरीच करायचे होते.

अनेक दिवस बेडरीडन असल्याने बाबांची सगळी गात्रे कडक झालेली होती... ते इतके जाम झालेले होते की त्यांना वळवताना, उचलताना मी आणि आई दोघीही गलितगात्र होऊन जायचो.... खरंतर आई सुद्धा थकली होती पण कुठून कसं बळ गोळा करायची देवास ठाऊक! असा जेमतेम एप्रिल पार पडला आणि मे महिन्याच्या ३ तारखेला आईच्या पोटात प्रचंड वेदना होऊ लागल्या , सतत उलट्या आणि पोटातल्या कळांनी ती अर्धमेली झाली. फॅमिली डॉक्टरांनी फोनवर काही गोळ्या सांगितल्या पण तीन दिवस उलटूनही फरक पडत नव्हता... शेवटी कशीबशी पोलीस परवानगी काढून त्यातल्या त्यात घराजवळच्या एका डॉक्टरांना गाठले... त्यांनी almost दुसऱ्या खोलीतूनच तपासले आणि किडनी स्टोनची शक्यता वर्तवत सोनोग्राफी करायला सांगितली. पण हाय रे दुर्दैवा!.... कोणतेच सोनोग्राफी सेंटर सुरू नव्हते... त्यात आमच्या नगराच्या बाहेर पडण्याचे जवळपास सगळे मार्ग ब्लॉक केलेले ... तिथून पुढे जाता येईना.. रस्त्यावर चिटपाखरूही नव्हते... होते ते फक्त पोलीस... तेही प्रचंड वैतागलेले, तणावाखाली होते. शेवटी 2 दिवसांनी एका मॅडमनी गुपचूप सोनोग्राफी सेंटर सुरू केले ... मागच्या दाराने चोरासारखे जाऊन सोनोग्राफी केली... पैसे किती पट दिले?? हा भाग आणिक वेगळा. आईच्या सोनोग्राफीत किडनी स्टोन किंवा इतर गुंतागुंत आढळली नाही ... तिच्यासाठी आठ दिवसांची औषधे घेऊन आम्ही परतलो... त्यात अतिरिक्त जागरणाने तिला आलेला प्रचंड थकवा पाहता तिला डॉक्टरांनी चक्क झोपेची गोळीच दिली.

आता ती पूर्ण दिवस आणि रात्री जवळपास झोपूनच होती... त्यामुळे बाबांचे सगळे मला पाहण्या शिवाय पर्याय नव्हता. बरोब्बर दोन दिवसांनी सकाळी बाबांच्या युरिनबॅग/ कॅथेटर मध्ये रक्त जमा झालेलं दिसलं... त्यांची शुद्ध हरपली होती आणि मी हादरले. जे जिवाच्या आकांताने टाळत होते ते झालंच... बाबांना ऍडमिट करायला लागणार होतं. तो पर्यंत नाशकातील जवळपास सगळीच हॉस्पिटल्स कोविड सेंटरमध्ये रूपांतरित झाली होती... त्यांचा तोळा मासा देह अश्या हॉस्पिटलमध्ये हलवणे प्रचंड धोक्याचे होते.. अखेर एक छोटेसे हॉस्पिटल मिळाले त्यांनीही बाबांची अवस्था पाहता त्यांना हॉस्पिटलाईज करून घेतले. बाबा ICU मध्ये इकडे आई आजारी..😢 हॉस्पिटलमध्ये कुणालाही थांबण्याची परवानगी नव्हती... पण हॉस्पिटलचे कँटीन बंद केलेले असल्याने... चहा ,पाणी , पेज, सूप, ज्यूस असं सगळं डाएट नुसार नेऊन द्यायला लागायचे... त्यासाठी तर कधी औषधांसाठी , इतर नर्सिंगच्या सामानासाठी दिवसांतून माझ्या सहासात चकरा हॉस्पिटलमध्ये व्हायच्या..... दर वेळी घरी आलं की नखशिखांत डेटॉलने अंघोळ... कपडे धुणं, सॅनिटायझर घरभर हात लावला असेल तिथे तिथे मारणं... हे सगळं वेड्यागत सुरूच होतं.... सोबत होती एक अनामिक भीती ,"मला कोरोना झाला तर ह्या सगळ्यांचं कसं??" अनेक नळ्यांनी जखडलेल्या बाबांना मी काचेपलीकडून नुसती बघायचे... किती हतबल होते मी?? ते सतत मला घरी न्या एव्हढेच म्हणायचे.

ह्या परिस्थितीत एकमेव आधार होता तो सासूबाईंचा..

Edit with WPS Office

दुसऱ्या दिवशी त्या चक्कर येऊन कोसळल्या... त्यांची शुगर कमालीची वर खाली होत होती... गेले कित्येक दिवसांत त्यांचा फोल्लो अप झालेलाच नव्हता. मात्र थोडे साखरपाणी दिले की त्यांना हुशारी वाटायची... असं दोन तीनदा झालं .मी हबकले, हादरले.... कुणीही मदतीला येऊच शकत नव्हते. हॉस्पिटल बाहेरच्या एका खुर्चीत मी बसकण मारली... माझ्याही नकळत मी कोसळले...लहान मुलासारखी रडायला लागले. एक आजी माझ्याशेजारी बसल्या आणि मला मायेने जवळ घेतलं... मी सुद्धा त्या अनोळखी बाईंच्या कुशीत मनसोक्त रडून घेतलं... थोडं शांत झाल्यावर आजींची आणि माझी ओळख पाळख झाली..गावाकडचे एक आजोबा बाबांसोबतच ऍडमिट होते... त्यांच्या पत्नी एक आजीबाई ... मोठ्ठ गोल लालबुंद कुंकू लावायच्या .. गेले काही दिवस त्या माझी धावपळ बघत होत्या... त्या बिचाऱ्या स्वतः प्रचंड विवंचनेत होत्या... आर्थिक, मानसिक ताण... आजोबांच्या औषधपाण्यासाठी पैसे रहावेत म्हणून त्या एक वेळ जेवत होत्या. मला त्यांनी अश्या परिस्थितीत धीर दिला जेव्हा माणूस अनोळखी माणसापासून चार हात लांब असायचा... शेवटी माणसाला माणसाचीच गरज असते आधारासाठी...मला त्या शांतपणे म्हणाल्या...

"जे नशिबात हाय ते काई चुकनार न्हाई... ताई देवापुढं हात जोड... ठीक व्हील सगळं.."

मला त्या शब्दांनी कमालीचं बळ मिळालं.... पुढे आठ दिवस मी हॉस्पिटलला गेले की आम्ही भेटायचो , गप्पा मारायचो. मी आवर्जून त्यांना चहा नाश्ता घेऊन जायची ... आजोबांनाही माझ्या हातचा चहा आवडल्याचे त्या म्हणाल्या मग मी थर्मासभरून चहा आणि बिस्किटे नेऊन त्यांना द्यायचे... आजोबांचा बेड बाबांच्या शेजारी हलविला ते बाबांशी बोलायचे त्यांना धीर द्यायचे... बाबांना थोडे स्थिर झाल्यावर dischage देणार असल्याचे सांगितले... आजीबाईंनी निरोप घेतांना त्यांनी माझ्या पाठीवरून हात फिरवला... आणि तोंडभरून आशीर्वाद देत म्हणाल्या

"देव तुझं भलं करो! पोरी ..माझ्यावरच का ही येळ आली असा विचार कंदी करू नगं... असं समज देवानी चार पोरं दिली हाईत तुला सांबाळायला... आता थोडी वयान मोठी हाईत लेकरं म्हणा ..." म्हणत त्या खळखळून हसल्या.

खरंच आहे ... म्हातारी माणसं लहान मुलंच तर असतात... माझ्याशी आजीबाईंचे कोणते ऋणानुबंध होते देवालाच ठाऊक... पण तिथून पुढे मी आंतरबाह्य बदलले... मनातली भीती ताण,पार भिरकावून दिले मी... मला चार लेकरं दिली आहेत देवाने... आणि त्यांना सांभाळण्यासाठी बळ सुद्धा तो नक्कीच देईल.

✒यशश्री रहाळकर